REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# लोकसाहित्य संकल्पना व स्वरूप



डॉ. विद्या पाटील
मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव.

## प्रस्तावना

लोकसाहित्याच्या अभ्यासाची सुरुवात साधारणत, १७ व्या शतकात पाश्चिमात्त्य देशात झाली. अठराव्या आणि एकोणविसाव्या शतकात लोकसाहित्याच्या अभ्यासाचे विशेष प्रयत्न झालेले दिसतात. एकोणविसाव्या शतकात लोकसाहित्याचे संकलन आणि या संकलनाचा शास्त्रीय अभ्यास झालेला आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या या प्रयत्नांतून लोकसाहित्याची संकल्पना, लोकसाहित्याचे स्वरूप, लोकसाहित्याचे विविध पैलू प्रकाशात येऊन सांस्कृतिक, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, धर्मशास्त्र, मानसशास्त्र इत्यादी विद्याशाखा व लोकसाहित्य यांच्यातील परस्पर संबंधही स्पष्ट होऊ शकले. पुढील काळात तर लोकसाहित्याच्या अभ्यासाची एक चळवळच सुरू झाल्याचे दिसते. समाज आणि संस्कृतीच्या दृष्टीने लोकसाहित्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे, हे अनेक अभ्यासकांनी स्पष्ट केलेले आहे. तेव्हा लोकसाहित्य म्हणजे काय? व लोकसाहित्यात कोणकोणत्या बाबींचा समावेश होतो याची चर्चा येथे करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## लोकसाहित्याची संकल्पना

Folklore या इंग्रजी शब्दासाठी आपल्याकडे लोकसाहित्य, लोकविद्या, लोकवार्ता व लोकसंस्कृती असे पारिभाषिक शब्द अभ्यासकांनी सुचविलेले आहेत. यातील लोकसाहित्य हा पारिभाषिक शब्द अभ्यासकांनी स्वीकारला आणि तो रूढ झाला. लोकसाहित्य या शब्दातील 'लोक' व 'साहित्य' यांना विशेष अर्थ आहे. पारंपरिक जीवन जगणारा लोकसमूह म्हणजे 'लोक' व या लोकांची जीवन जगण्याची साधन–सामग्री म्हणजे 'साहित्य'. या अर्थाने 'परंपरेने चालत आलेली लोकजीवन पद्धती' म्हणजेच लोकसाहित्य असे स्थूलमानाने म्हणता येईल.

पारंपरिक लोकजीवनात परंपरांना अत्यंत महत्त्व असते. या परंपरा अत्यंत निष्ठेने आणि श्रद्धेने लोकजीवनात पाळल्या जातात. परंपरेने चालत आलेले धार्मिक व कौटुंबिक विधी, रुढी–प्रथा, आचार–विचार, नवस–सायास, व्रत–वैकल्ये, व्यवसाय, खाद्य–पदार्थ, लोककला व मौखिक शब्दाविष्कार यांना लोकजीवनात महत्त्वाचे स्थान असते. या सर्व बाबींचा त्यामुळेच लोकसाहित्यात समावेश केला जातो.

लोकसाहित्य हे एकूणच लोकजीवनाला व्यापणारे असते. लोकजीवनातील प्रत्येक कृती आणि उक्ती यांचा समावेश लोकसाहित्यातच होतो. लोकसाहित्याची निर्मिती लोकमानसातून, लोकांच्या जीवन जगण्यातून होत असते. लोकसाहित्याची निर्मिती जाणीवपूर्वक केली जात नाही तर ती स्वाभाविकपणेच होत असते. लोकसाहित्याची निर्मिती लोकजीवनात होत असते. लोकजीवनाला आकार या निर्मितीतून, स्वीकारातून येत असतो. त्यामुळेच लोकसाहित्यातून लोकांची प्रकृती, जीवनाकडे तसेच निसर्गाकडे पाहण्याची लोकांची दृष्टी व लोकांची सर्जनक्षमता प्रकट होत असते.

परंपरेने चालत आलेले ज्ञान व जीवन जगण्याची पद्धती म्हणजेच लोकसाहित्य. जीवन जगताना येणाऱ्या अनुभवातून, सभोवतीच्या परिस्थितीच्या व निसर्गाच्या अवलोकनातून लोकांना हे ज्ञान प्राप्त झालेले असते व परंपरेने हे ज्ञान एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत पोहोचत असते. या ज्ञानाच्या आधारेच लोकजीवन जगत असतात. लोकांची जीवन जगण्याची पद्धती आकारास येत असते.

सभोवतीच्या निसर्गातील मानवी जीवनाला उपकारक तसेच घातक तत्त्वे कोणती यांचे ज्ञान निसर्गाच्या सहवासात राहताना लोकांना प्राप्त झालेले असते. निसर्गातील उपकारक तत्त्वांना प्रयत्न करून घेण्यासाठी तसेच घातक तत्त्वांना दूर ठेवण्यासाठी लोकमानस कृती—उक्तींचा आविष्कार घडवितात. या कृती—उक्तीतुनच लोकसाहित्य आकारास येते.

लोकसाहित्य हे लोकमानसाची सहज व स्वाभाविक अभिव्यक्ती आहे. लोकमानसाची ही कृती—उक्तीतून होणारी अभिव्यक्ती परंपरेने एका पिढीपासून दुस—या पिढीपर्यंत चालत आलेली असते. या अभिव्यक्तीमागील लोकचेतना लोकसाहित्याला उभारी देत असते. लोकजीवनात प्रचलित ठेवीत असते.[1]

लोकसाहित्य ही लोकांची—समूहाची निर्मिती असते. ही निर्मिती परंपरेने होत असते. परंपरेने लोकसाहित्य लोकजीवनात प्रचलित राहत असते. बदलत्या काळाप्रमाणे, जीवनप्रवाहाप्रमाणे त्यात स्वाभाविक बदलही घडत असतो. लोकसाहित्याची निर्मिती आणि प्रचलन आदिमकाळापासूनचे आहे. लोकचेतनेच्या बळावर ते आजपर्यंत टिकून राहिलेले आहे. त्यामुळेच लोकसाहित्यात आदिम जीवनाचे काही विशेष अवशेष रूपात टिकून राहिलेले दिसतात. निसर्गतत्त्वांची पूजा, प्राणीपूजा, यासारखे अवशेष आजही लोकजीवनात टिकून राहिलेले आहेत.

गास्टर या लोकसाहित्याच्या अभ्यासकाच्या मते, 'लोकसाहित्य हा लोकसंस्कृतीचा महत्त्वाचा घटक असून, तो लोकांकडूनच जतन केला जातो. लोकसाहित्य हे लौकिक परंपरांचा निधी असून, त्यात कला व वाड्.मय यांचा स्रोत असतो.'[2] यावरून लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांच्यातील परस्पर संबंध लक्षात येतात. लोकसाहित्यातूनच लोकसंस्कृतीला धुमारे फुटतात. लोकसंस्कृतीला एक वेगळेपण प्राप्त होत असते.

लोकसाहित्यात समाजजीवनाचा तसेच मानववंशाचा इतिहास असतो. आदिमकाळातील लोकजीवनापासून सुरू झालेला समाजजीवनाचा प्रवाह पुढील काळात कसा बदल स्वीकारीत आला तसेच मानववंशाचा विकास कस कसा घडत गेला, हे लोकसाहित्याच्या अभ्यासातून लक्षात येऊ शकते.

जॉर्ज हरझॅक या अभ्यासकाच्या मते, लोकसाहित्यात भूतकालीन जीवन विशेषांचे अवशेष मौखिक परंपरेने टिकवून ठेवलेले असतात.[3] लोकसाहित्याच्या या विशेषामुळेच समाजजीवनाच्या इतिहासाचा वेध आपल्याला घेता येतो. 'प्राचीन समाजजीवाचे अविनाशी अवशेष म्हणजे लोकसाहित्य', असे फ्रान्सिस पॉटर म्हणतात ते यामुळेच.[4] याचाच अर्थ असा की, पारंपरिक लोकजीवनाचे दर्शन लोकसाहित्यातून घडते.

आर्चर टायलर या अभ्यासकाने शब्द, कल्पना आणि वस्तू, कृती अशी लोकसाहित्याची सामग्री असते असे म्हटले.[5] आहे. लोकसाहित्य म्हणजे पारंपरिक लोकजीवनपद्धती अशी लोकसाहित्याची संकल्पना असल्याने, लोकजीवनातील सर्वच बाबी मग तो शाब्दाविष्कार असो, कल्पना, भावना, विचार असो, वास्तू, व्यवसायाशी संबंधित वस्तू आणि कौशल्ये असते, खाद्य पदार्थ, वेशभूषा असो त्यांचा समावेश लोकसाहित्यातच होतो. विधि आणि विधि आचरण, नृत्य, संगीत, खेळ या सारख्या कला, यातुकल्पना इत्यादींचाही समावेश लोकसाहित्यातच होतो. यावरून लोकसाहित्य ही संकल्पना एकूणच लोकजीवनाला, लोकांच्या जगण्याला व्यापणारी आहे. याचाच अर्थ असा की, लोकजीवनाचा जेवढा विस्तार आहे तेवढा विस्तार लोकसाहित्याचा असतो. लोक ज्या भूभागात राहतात तो भूभाग, त्यांचे भौतिक जीवन आणि त्यांची संस्कृती या सार्‍यांचा संबंध लोकसाहित्याशी स्वाभाविकपणेच असतो.[6]

लोकसाहित्याच्या संकल्पनेचा विचार करताना लोकसंस्कृती या संकल्पनेचाही विचार करणे महत्त्वाचे वाटते. संस्कृती ही लोकांच्या जगण्यातून, धारणातून आकारास येत असते. त्यांतूनच संस्कतीला धुमारे फटत असतात. लोकसंस्कृती म्हणजे लोकांची जीवन जगण्याची पद्धती, लोकधाटी किंवा लोकरहाटी होय. लोकसाहित्याची लोकजीवनाला असलेली व्याप्ती पाहता लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती या संकल्पना एकच आहेत असे म्हणता येते. लोकजीवनातूनच लोकसाहित्याला आकार प्राप्त होत असतो. लोकसाहित्यात संपन्नता येत असते. लोकजीवनातूनच लोकसंस्कृतीला विविध पैलू प्राप्त होत असतात. लोकसाहित्याच्या तसेच लोकसंस्कृतीच्या जडणघडणेमागे लोकधारणा कार्यरत असतात. लोकाचार हा समानघटक लोकसाहित्यात व लोकसंस्कृतीत महत्त्वाचे कार्य करतो. त्यामुळेच लोकसाहित्य व लोकसंस्कृती यात बरेच साम्य पाहवयास मिळते.

थोडक्यात, लोकसाहित्य म्हणजे पारंपरिक लोकजीवन पद्धती होय. परंपरेने चालत आलेल्या लोकजीवनातील लोकाचार, कृती—उक्ती, शाब्दाविष्कार लोककला लोकांचे जगणे या सर्व बाबींचा समावेश लोकसाहित्यातच होतो. लोकजीवनात मौखिक रूपाने प्रचलित लोकगीत, लोककथा, यांसारखे

शाब्दाविष्कार–लोकवाङ.मय हा लोकसाहित्याचा एक भाग आहे. लोकवाङ.मयाचा अभ्यास करताना लोकजीवन तसेच लोकसाहित्य विचारात घेणे महत्त्वाचे असते.

## लोकसाहित्याचे स्वरूप

लोकजीवनात परंपरेने चालत आलेल्या व प्रचलित असलेल्या सर्व बाबींचा समावेश लोकसाहित्यातच होत असल्याने पारंपरिक लोकजीवन पद्धती म्हणजेच लोकसाहित्य असे स्थूलमानाने म्हणता येते. पारंपरिक लोकजीवनातील काही बाबी पुढीलप्रमाणे सांगता येतात–

1. लोकाचार– आचार–विचार, रुढी–प्रथा, रिती–रिवाज इत्यादी.
2. लोकविश्वास, लोकश्रद्धा, लोकसमजुती इत्यादी.
3. धर्मविधी, संस्कारविधी, कौटुंबिक व सामुदायिक विधी, सण–उत्सव, व्रत–वैकल्ये, नवस–सायास इत्यादी.
4. निसर्गतत्त्वाविषयीचे लोकमानसाला झालेले आकलन, त्यांचे स्पष्टीकरण, त्या संदर्भातील कृती–उक्ती.
5. यातुकल्पना.
6. पारंपरिक व्यवसाय व कौशल्ये, वेशभूषा, खाद्यपदार्थ इत्यादी.
7. लोककला, मनोरंजनाची साधने इत्यादी.
8. लोकगीते, लोककथा, लोककथागीते, उखाणे, म्हणी इत्यादी.

या सर्व बाबींना एक परंपरा असते. या परंपरेतूनच त्या लोकजीनावत प्रचलित असतात. त्यांना लोकमान्यता मिळालेली असते. या परंपरांना आणि बाबींना लोकजीवनात महत्त्वाचे स्थान लाभलेले असते. या परंपरा, या बाबी पाळण्याचे, जतन करण्याचे कार्य लोकजीवनाकडून घडत असते. लोकसाहित्याची निर्मिती स्वाभाविकपणेच लोकजीवनात होत असते. लोकसाहित्याच्या जडण–घडणेत लोकजीवनात महत्त्वाचा वाटा असतो. त्यांतूनच लोकसाहित्य आणि लोकजीवन यांच्यात एक अतूट नातं निर्माण होताना दिसते.

परंपरा हे लोकसाहित्याचे एक प्रमुख तत्त्व आहे. ही परंपरा अलिखित असते. लोकजीवनातील अनेक बाबींत परंपरा असते. आज समाजजीवनात प्रचलित असलेल्या काही परंपरा हजारो वर्षांपूर्वीच्या आदिम जीवनात निर्माण झालेल्या आहेत. वृक्षपूजेची, प्राणीपूजेची, जलपूजेची परंपरा, निसर्गातील मानवी जीवनाला उपकारक ठरणाऱ्या तत्त्वांत देवत्व पाहण्याची परंपरा, नृत्य–खेळ यांची परंपरा, विधि आचरण, जत्रा, यात्रा, उत्सव साजरा करण्याची परंपरा, कथा सांगण्याची परंपरा, गीतांची परंपरा यांसारख्या परंपरा प्राचीन काळापासून समाजजीवनात प्रचलित असल्याचे पाहवयास मिळते. या परंपरा सातत्यामुळेच प्राचीन समाजजीवनाचे व संस्कृतीचे विशेष पुढील काळातील समाजजीवनात स्वाभाविकपणेच आलेले असते.

लोकसाहित्याची निर्मिती आणि प्रचलन प्रामख्याने निरक्षर, शहरी संस्कृतीपासून दूर परंपराप्रिय लोकजीवनात होत असते. लोकसाहित्य हे त्या त्या लोकजीवनाचा अविभाज्य भाग असते. ते जगणेच असते. आपण लोकसाहित्य जगतो याची जाणीव या लोकसमूहाला नसते. त्यामुळेच त्यांचे जगणे, त्यांचे जीवन लोकसाहित्य ठरते.

'लोक' आणि 'लोकसाहित्य' यांना एकमेकांपासून वेगळे करता येत नाही. जेथे 'लोक' तेथे 'लोकसाहित्य' असते[7].लोकसाहित्य हे 'लोकां'चे असते. 'लोक' लोकसाहित्यातच जगत असतात. लोकसाहित्य जगतो याची जाणीव लोकांना नसते. त्यांचे या स्वरूपी जगणे सहज आणि स्वाभाविक असते. म्हणूच लोकसाहित्यातून लोकजीवनाचा आविष्कार घडत असतो.

लोकसाहित्यात परंपरेने चालत आलेले ज्ञान असते, शहाणपण असते. कित्येक शतकातील लोकांच्या अनुभवातून हे ज्ञान प्राप्त झालेले असते. हे ज्ञान निसर्ग आणि निसर्गतत्त्वे यांच्याविषयीचे आहे. निसर्गाच्या सहवासात राहत असताना, निसर्गाच्या आकलनातून हे ज्ञान लोकांनी प्राप्त केलेले असते. लोकांचे हे ज्ञान मानवी जीवन, मानवाचे वर्तन, आचार–विचार, विषयक आहे. या विषयीचेही ज्ञान लोकांना परंपरेने प्राप्त झालेले असते. हे ज्ञान मौखिक परंपरेने व अनुभवाने एका पिढीपासून दसऱ्या पिढीला स्वाभाविकपणेच मिळत असते.

लोकसाहित्यात लोकजीवनाचे नितळ प्रतिबिंब पडलेले असते. याचे कारण लोकमानसाच्या, लोकजीवनाच्या कृती–उक्ती म्हणजेच लोकसाहित्य होय. लोकरुढी–प्रथा, लोकश्रद्धा–लोकसमजुती, विधि–विधाने, भौतिक संस्कृती, लोककला व मौखिक शाब्दाविष्कार इत्यादी लोकजीवनाच्या विशेषांचा समावेश लोकसाहित्यात असतो[8].

थोडक्यात, परंपरा हे लोकसाहित्याचे प्रमुख तत्त्व असून, ही परंपरा मौखिक असते. लोकसाहित्याची निर्मिती ही समुहाची निर्मिती असते. लोकसाहित्याची ही निर्मिती लोकांच्या जगण्यातून स्वाभाविकपणेच होत असते. लोकसाहित्यातून लोकजीवनाचा व लोकसंस्कृतीचा आविष्कार घडतो. लोकसाहित्याच्या निर्मितीमागे लोकमानस असते. लोकसाहित्य हे भौतिक तसेच मनोमय स्वरूपाचे असते. लोकसाहित्यात पारंपरिक ज्ञान असते. अनेक ज्ञानशाखा, कला व वाड्.मय यांचे मूलस्रोत लोकसाहित्यात असतात. लोकसाहित्य एकूणच लोकजीवनाला व्यापणारे असून, त्यांत समाजजीवनाचा इतिहास नोंदविलेला असतो.

## संदर्भ


1. डॉ. कुंदनलाल उप्रेती, लोकसाहित्य के प्रतिमान, प. 12
2. डॉ. प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे स्वरुप', प 19
3. Leach Maria, 'Standard Dictionary of Folklore' Vol. I, p.400
4. तत्रैव, प. 401, 402
5. तत्रैव, प. 402
6. डॉ. प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे स्वरुप', प. 26
7. डॉ. अनिल सहस्त्रबुदधे, 'लोकबंध', प्र.109
8. डॉ. प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे स्वरूप,' 'प.47